दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/३६/२०१९
दि.१५/०४/२०१९.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.राजु विश्वकर्मा, ...............अपिलार्थी
फाईट फॉर राईट (एन.जी.ओ.), शॉप नं.५,
जयसाई पुजा बिल्डींग, कस्तुरी पार्क,
नवघर रोड, भाईंदर (पूर्व).

OC

जनमाहिती अधिकारी तथा, ...............प्रतिवाद
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

## -: विवेचन :-

श्री.राजु विश्वकर्मा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे दि.११/०१/२०१९ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) दि.१ एप्रिल २००८ ते ३१/१२/२०१८ पर्यंत मृत्यू/ दिवंगत झालेल्या सफाई कामगारांची यादी व संपुर्ण दस्ताऐवजाची सत्यप्रत कॉपी उपलब्ध करुन देण्यात यावी.
२) दि.१ एप्रिल २००८ ते ०१/१२/२०१८ पर्यंत मृत्यू/ दिवंगत झालेल्या सफाई कामगारांचे मृत्यूप्रमाण पत्र, वारस दाखले तसेच नामनिर्देशन पत्रे, यादी- नाव व पत्त्यासहित व संपुर्ण दस्ताऐवजाची सत्यप्रत कॉपी उपलब्ध करुन देण्यात यावी.
३) दि.१ एप्रिल २००८ ते ०१/१२/२०१८ पर्यंत मृत्यू सेवानिवृत्त रुग्णता सेवा निहत झालेल्या सफाई कामगारांची नावे/ पत्त्यासहित यादी व संपुर्ण दस्ताऐवजाची सत्यप्रत कॉपी उपलब्ध करुन देण्यात यावी.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**
माहिती अधिकार अंतर्गत माहिती दिली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.१८/०३/२०१९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**
अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१२/०४/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/५०/२०१९ दि.०४/०४/२०१९ अन्वये कळविण्यात आले होते.

परंतु, सदर दिवशी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ कामी जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे बैठक असल्याकारणाने सुनावणी रद्द करण्यात आली असुन सदर सुनावणी दि.१५/०४/२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता आयोजित करण्यात आली असुन अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी

Scanned by CamScanner

तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना सुनावणीस उपस्थित राहणेबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/६२/२०१९ दि.११/०४/२०१९ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माझ्या दि.११/०१/२०१९ रोजीच्या पत्रानुसार दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात आलेली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांनी मुद्दा क्र.२ व ३ बाबत विधी विभागाचे मार्गदर्शन घेऊन माहिती अपिलार्थी अर्जदारास ७ दिवसांत विनाशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

**(दिपक पुजारी)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (आस्थापना)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति:-**

१) श्री.राजु विश्वकर्मा,
फाईट फॉर राईट (एन.जी.ओ.), शॉप नं.५,
जयसाई पुजा बिल्डींग, कस्तुरी पार्क,
नवघर रोड, भाईंदर (पूर्व).

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

१८/५/१९

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.

Scanned by CamScanner